# प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यासाची उद्दिष्टये

१.३ अभ्यास पध्दती

१.४ तथ्य संकलन

१.५ अभ्यासाची योजना

# प्रकरण पहिले

# संशोधन पध्दती

## १.१ प्रस्तावना :

जगातील सहकारी पतपुरवठा चळवळीची जर्मनी ही जन्मभूमी होय. याही देशात गरजेचे अपत्य म्हणूनच सहकारी चळवळ उदयास आली. कालांतराने या चळवळीचे लोण संपूर्ण जगभर पसरले.

समाजातील दुर्बल घटकांना व विशेषत: अग्रक्रम क्षेत्रांना आर्थिक साहाय्य करणाऱ्या बँका म्हणून नागरी सहकारी बँकांना एक वेगळे व महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. लघुउद्योजक, छोटे तंत्रज्ञ, घाऊक व्यापारी, छोटे व्यापारी, हातगाडीवाले, फेरीवाले, कुशल कारागीर, शहरी व निमशहरी भागातील पगारदार, नोकरदार इत्यादींना नागरी बँका व्यक्तीगत हमीवर कर्जपुरवठा करीत असतात. त्याच बरोबर ठेवी स्वीकारणे, लोकांना बचतीची सवय लावणे, आपल्या ग्राहकांना बँकिंग सेवा उपलब्ध करुन देण्याचे कार्य त्या करीत असतात.

सर्वसाधारणपणे सहकारी बँकांचे दोन गटात वर्गीकरण केले जाते. शेती व बिगर शेती कर्ज पुरवठा नागरी बँकांचा समावेश बिगर शेती पतपुरवठा क्षेत्रामध्ये होतो.

बिगर शेती क्षेत्रातील सहकारी पतपुरवठा अभ्यास गटाने नागरी सहकारी बँकेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे :

" कोणत्याही पतपुरवठा संस्थेची नोंदणी राज्य सरकारच्या सहकारी संस्थांच्या कायद्याप्रमाणे झाली पाहिजे. तसेच तिचे कमीतकमी भाग भांडवल रु. ५०,०००-०० असले पाहिजे. तिने शहरी व निमशहरी भागातील आपल्या म सभासदांना व संबंधित व्यक्तींना बँकिंग सेवा पुरविल्या पाहिजेत. तरच तिला नागरी सहकारी बँक म्हणता येईल."

नागरी सहकारी बँकांच्यावर रिझर्व बँकेचे आणि सहकारी खात्याचे नियंत्रण असते. नागरी सहकारी पतपुरवठा संस्थांच्यावर मात्र रिझर्व बँकेचे नियंत्रण नसते. कारण त्या बँकिंग सेवा पुरवित नाहीत.

भारतातील एकूण १३६३ नागरी सहकारी बँका व त्यांच्या ३०६४ शाखांपैकी ३२४ नागरी सहकारी बँका व त्यांच्या १३१७ शाखा एकट्या महाराष्ट्र राज्यात आहेत. भारतातील एकंदर नागरी बँकांपैकी १०० वरच्या दर्जाच्या बँकांपैकी ४८ नागरी सहकारी बँका महाराष्ट्रात असून त्यांचे प्रमाण ४८ टक्के आहे. त्याशिवाय नव्याने परवानगी दिलेल्या ८९४ नागरी सहकारी बँकांपैकी २९३ बँका केवळ महाराष्ट्रातत आहेत. आणखी विशेष बाब म्हणजे देशात एकूण ३३ महिला नागरी सहकारी बँका आहेत. त्यापैकी २० महिला सहकारी बँका केवळ महाराष्ट्रात आहेत.

भारतात नागरी सहकारी बँकांचा उगम मागासवर्गीय व अल्प उत्पन्न गटातील लोक यांच्या कर्जाच्या गरजेतून झालेला आहे. सामाजिक परिवर्तन व गरीबांचा आर्थिक विकास असे दुहेरी कार्य या बँका करीत असून गरीबातील गरीब माणसाला बचतीसाठी प्रवृत्त करून गरजवंताना सुलभ रीतीने कर्ज पुरवठा करण्यासाठी या बँका आवश्यक आहेत.

विशेषत: नागरी सहकारी बँका या गेल्या १५-२० वर्षांतच विकसित झाल्या असून भारतात सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात आहे. म्हणजेच त्यांचा प्रादेशिक विकास असमान राहिला. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू व पश्चिम बंगाल या सहा राज्यात देशातील एकूण ४० टक्के नागरी सहकारी बँका आहेत.

कोल्हापूर जिल्हात एकूण ४२ बँका आहेत. त्यापैकी सर्वप्रथम म्हणजे २४ मे, १९१३ रोजी ` दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँकेची स्थापना झाली व दहाव्या क्रमांकाला १२ मे, १९३७ रोजी श्री महावीर को-ऑप. बँकेची स्थापना झाली.

नागरी सहकारी बँकांनी, नागरी विकासात अत्यंत महत्वाची भूमिका बजावल्यामुळे त्यांचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. या प्रबंधात सर्वच नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे श्री महावीर को-ऑप. बँकेचा एक विशेष अभ्यास केला आहे. बँकेचे चेअरमन, मॅनेजर, अकौंटंट, संचालक मंडळ, अधिकारी वर्ग यांच्या बरोबर चर्चा करुन तसेच निरनिराळे वार्षिक अहवाल, रौप्य महोत्सवी व सुवर्ण महोत्सवी अंक, जिल्हा उपनिबंधकांकडील कागदपत्रे प्रधान कार्यालयातील ऑफिस रेकॉर्ड प्रवक्त्या बरोबर चर्चा इत्यादी मार्गांनी तथ्य संकलन केले आहे.

श्री. महावीर को-ऑप. बँक इतर नागरी बँका प्रमाणेच कार्य करीत आहे. त्यामुळे अभ्यासाचे निष्कर्ष अनेक नागरी बँकाना उपयुक्त ठरणार आहेत. तरी सुध्दा हे निष्कर्ष पूर्णपणे लागू होतीलच असे नाही. कारण प्रत्येक नागरी सहकारी बँकेचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. त्यानुसार त्या बँकेचे कार्य चालू असते.

थोडक्यात, नागरी सहकारी बँकांच्या संदर्भात महाराष्ट्र हे राज्य अग्रेसर आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्रातील नागरी सहकारी चळवळ ही देशातील अग्रक्रमांकाची मानली जाते. त्यासाठीच नागरी बँकाचा संपादनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रस्तुत लघु शोध प्रबंधामध्ये एका बँकेचा संपादनात्मक अभ्यास केला आहे. ती बँक आहे श्री. महावीर को-ऑप. बँक लि., कोल्हापूर या बँकेची निवड हेतुपुरस्सरकेली आहे. या बँकेचा सुवर्ण महोत्सव १९८६-८७ साली पार पडला. त्याच्या ५० वर्षांच्या काळात बँकेने भरीव कार्य केले आहे. आणि विशेष म्हणजे ५० वर्षातील प्रगतीचा आराखडा उपलब्ध होऊ शकला म्हणून या बँकेच्या अभ्यासाचे महत्व वाटल्यावरुन या बँकेची निवड केली आहे.

१.२ अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१) भारतातील, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीचा आढावा घेणे व तुलनात्मक अभ्यास करणे.

२) कोल्हापूर जिल्हातील नागरी सहकारी बँकांच्या उगमाचा व प्रगतीचा आढावा घेणे.

३) श्री. महावीर को-ऑप. बँकेचा विकास व कार्यपध्दतीचा आढावा घेणे.

४) सन १९३७ ते १९९१ या कालावधीतील या बँकेच्या सभासद, वसूल भाग भांडवल, खेळते भांडवल, ठेवी, कर्ज वितारण, राखीव निधी, गुंतवणूक, नफा, उत्पन्न, खर्च, बँक चालविणेचा खर्च, थकबाकी, शाखा विस्तार, लाभांश, दर व सेवक वर्ग इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

५) सन १९८२ ते १९९१ या कालावधीत बँकेने केलेल्या कारणपरत्वे कर्ज वितरणाचा अभ्यास करणे.

६) बँकेच्या अधिक कार्यक्षमतेसाठी बँकेला उपयुक्त व आवश्यक सुधारणा सुचविणे.

७) बँकेचा संपादनात्मक अभ्यास करणे.

१.३ अभ्यास पध्दती :

नागरी सहकारी बँकांचे सूक्ष्मलक्षी संपादनात्मक विश्लेषण करताना सर्वच बँकांचा अभ्यास करणे अशक्य आहे. आणि त्यामुळेच प्रस्तुत अभ्यासासाठी कोल्हापूर शहरातील " श्री. महावीर को-ऑप. बँक लि., कोल्हापूर " या बँकेची निवड केली आहे. कोल्हापूरात नागरी सहकारी बँकांच्या चळवळीत स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक बँका स्थापन झाल्या आहेत. त्यापैकी १९३७ अखेर म्हणजे पहिल्या नागरी बँकेपासून (१९१३) २४ वर्षांच्या कालावधीत एकूण

१० बँका स्थापन झाल्या. या दहापैकी ' श्री. महावीर को-ऑप. बँक ' ही एक होय. जिल्हातील एकूण ४२ बँकापैकी पहिल्या दहामध्ये असलेल्या या जुन्या बँकेचा अभ्यास व्हावा यासाठी या बँकेची निवड करण्यात आली आहे.

श्री. महावीर को-ऑप. बँकेच्या स्वतंत्रपणे केलेल्या एका विशेष अभ्यासावरून किंवा विश्लेषणावरून काढलेले निष्कर्ष कोल्हापूर जिल्हातील सर्वच बँकाना अगदी तंतोतंत लागू पडतीलच असे नाही परंतु या अभ्यासावरून नागरी सहकारी बँकांच्या कार्यपध्दतीचा अंदाज मात्र निश्चित येईल. प्रस्तुत अभ्यासात एकाच नागरी सहकारी बँकेचा अभ्यास असल्याने म्हणजेच तुलनात्मक पध्दती नसल्याने येणा-या निष्कर्षांची व्याप्ती देखील मर्यादित ठरणार आहे. नागरी सहकारी बँकांची कार्यपध्दती कशी असावी यावरून श्री. महावीर को-ऑप. बँकेची कार्यपध्दती कशी असेल याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदरच्या अभ्यासामध्ये केला आहे. या बँकेचा सुवर्ण महोत्सव अलिकडेच म्हणजेच १९८६-८७ मध्ये संपन्न करण्यात आला. सुवर्ण महोत्सवापर्यंन्तची बँकेची वाटचाल लक्षात येण्याच्या दृष्टीने अभ्यासावर व विश्लेषणावर भर दिला आहे.

प्रारंभी जिल्हातील नागरी बँकांच्या संदर्भात महावीर बँकेचे स्थान कुठे आहे ते तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर महावीर बँकेचा विविध क्षेत्रातील प्रगतीचा आलेख तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी १९३७-३८ ते १९९०-९१ पर्यंन्तच्या समग्र आकडेवारीचा उपयोग करून घेतला आहे. ठेवी, कर्ज वितरण, उत्पन्न, खर्च, नफा, लाभांश, सभासद, भाग भांडवल, इत्यादी क्षेत्रातील बँकेचा विकास क्रमाक्रमाने मांडलेला आहे असे करीत असताना मागील वर्षाच्या तुलनेने चालू वर्षाची स्थिती कशी आहे हेही पाहिले आहे. आणि शेवटी बँकेच्या स्वास्थ्य संहितेचा, रक्षमतेच्या आणि लाभप्रदतेच्या गुणोत्तराचा अभ्यास करून बँकेच्या संपादनात्मक

अभ्यासाची चिकित्सक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि संशोधनाची व्याप्ती मर्यादित ठेवण्याच्या उद्देशाने संपादनात्मक अभ्यासाला विशेष महत्त्व देऊन विश्लेषण केले नाही. पुढील संशोधनासाठी त्या विषयावर भर देता येईल. किंबहुना त्या पध्दतीचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

१.४ तथ्य संकलन :

प्रस्तुत प्रबंधाचे लेखन करीत असताना आवश्यक असणारी अत्यंत उपयुक्त माहिती, आधार संदर्भ, अंक संकलन, इत्यादीसाठी वेगवेगळया मार्गांचा अवलंब करावा लागला.

१) सदर संशोधनासाठी बँकेची माहिती मिळविण्यासाठी संचालक मंडळ, चेअरमन, मॅनेजर, चीफ अकौंटंट, जयसिंगपूर शाखेचे एजंट, अधिकारी वर्ग, तसेच बँकेतील दीर्घानुभवी कर्मचारी वर्ग व बँकींग क्षेत्रातील इतर अनुभवी लोक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अभ्यासाचा हेतू स्पष्ट केला व त्यासंबंधीत चर्चा केली. यामुळे अंक संकलन सोपे झाले. प्रस्तुत शोधप्रबंधासाठी १९३७-३८ ते १९९०-९१ या काळातील वार्षिक अहवाल तपासून पाहिले. त्यावरूनच आवश्यक माहिती संकलित केली. दुय्यम स्वरूपाचे संदर्भ, ग्रंथालय, स्मरणिका, वर्तमान पत्रलेखन याद्वारे मिळविले आहेत.

२) सदरच्या अभ्यासासाठी दुय्यम सामुग्रीचा उपयोग केला आहे.

अ) श्री.महावीर को-ऑप. बँक लि., कोल्हापूर याचा रौप्य महोत्सवी अंक, सुवर्ण महोत्सवी अंक व संबंधित वर्षांचे प्रसिध्द झालेले वार्षिक अहवाल.

ब) कोल्हापूर शहरातील इतर नागरी सहकारी बँकांचे प्रसिध्द झालेले वार्षिक अहवाल.

क) बँकेच्या स्थिती संदर्भात असलेली विविध पत्रके.

३) विविध संदर्भ ग्रंथ, विविध नागरी सहकारी बँकांचे रौप्य महोत्सवी, सुवर्ण महोत्सवी व अमृत महोत्सवी अंक, विविध समित्यांचे अहवाल, सहकारी बँक डायरी, नियतकालिके, जिल्हा सहकारी उपनिबंधकांची कागदपत्रे, भाषणं, चर्चा इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित केली आहे.

१.५ <u>अभ्यासाची योजना</u> :

सदरच्या प्रबंधात अभ्यासाची खालील सहा प्रकरणात विभागणी केली आहे :

पहिल्या प्रकरणात अभ्यासाची उद्दिष्टये मांडून अभ्यास पध्दती सांगितलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणात नागरी सहकारी बँका - उगम आणि विस्तार याचे विवेचन केले आहे.

तिसऱ्या प्रकरणात कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचा उगम, विस्तार व प्रगती याचा आढावा घेतला आहे.

चौथ्या प्रकरणात श्री. महावीर को-ऑप. बँक लि., कोल्हापूर या बँकेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, बँकेचे व्यवस्थापन व १९३७ ते १९९१ या कालावधीतील विविध क्षेत्रातील स्थितीची माहिती देण्यात आली आहे.

पाचव्या प्रकरणात बँकेचा संपादनात्मक अभ्यास मांडलेला आहे.

शेवटी अभ्यासाचे निष्कर्ष सहाव्या प्रकरणात मांडले आहेत.